उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन), पुणे कार्यालयाच्या दुरूस्ती कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय, क्रमांकः- प्रशामा २०२६/प्र.क्र.२२७/पासु-२
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१.
दिनांकः- ०८ जुलै, २०२६.

वाचा :

उपसंचालक, आरोग्य सेवा, (परिवहन) पुणे यांचे पत्र क्रमांक: आसेप/कक्ष-११७(४) /कार्या.भांडार/दुरूस्ती/लहान बांधकाम/८२३१-३३ /२०२६, दि.२६.०५.२०२६

प्रस्तावना :

उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन), पुणे कार्यालयाच्या दुरूस्ती कामाच्या रु.३५.०० लक्ष इतक्या किमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन), पुणे कार्यालयाच्या दुरूस्ती कामाच्या रु.३५.०० लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास सोबत जोडण्यात आलेल्या Recapitulation sheet प्रमाणे खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२) अटी व शर्ती :-

१) कामासाठी निविदा मागविण्यापूर्वी सदर कामास मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची तांत्रीक मंजुरी घेणे आवश्यक राहील.

२) काम सुरु करण्यापुर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरु करावे.

३) बांधकामासाठी उपलब्ध होणाऱ्या नियतव्ययामधून सदर कामास निधी उपलब्ध करुन देण्याच्या अटीच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

४) सदर कामाची ई-निविदा करतांना कामाचे तुकडे न करता एकत्रित निविदा करण्यात यावी.

५) कामासाठीच्या जागेची उपलब्धता, योग्यता व जागा पुरेशी आहे किंवा नाही याबाबतची खात्री संबंधित आरोग्य संस्था प्रमुखांनी करावी.

६) सदरचे अंदाजपत्रक हे ढोबळ नमुना अंदाजपत्रक असल्याने, या कामांच्या सविस्तर अंदाजपत्रकांना तांत्रीकदृष्ट्या मान्यता ही सार्वजनिक बांधकाम खात्याच्या त्या-त्या क्षेत्राच्या सक्षम अधिकाऱ्यांकडून करण्यात येईल.

७) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/तां.क.१ दि. १० जानेवारी,२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

८) क्षेत्रीयस्तरावर सदर कामाचा संबंधीत उपसंचालक, आरोग्य सेवा व जिल्हा शल्य चिकित्सक यांनी वेळोवेळी आढावा घ्यावा.

९) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.बीडीजी २०१७/प्र.क्र.६०/इमा-२, दि.०७.०७.२०१७ अन्वये कार्यवाही करावी.

१०) नियोजित जागा उपभोक्ता विभागाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुनच सदर कामाच्या निविदा सुचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

३. उपरोक्त १ ते १० येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग व उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन) यांची राहील.

४. सदर कामावरील खर्च मागणी क्रमांक- आर-१, मुख्यलेखाशिर्ष "२२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६- सार्वजनिक आरोग्य, ००१- संचालन व प्रशासन, ०१- सह संचालक (आरोग्य सेवा), पुणे (०१)(१०) - सार्वजनिक आरोग्य परिवहन संघटनेची आस्थापना (अनिवार्य) (२२१० १०५३) २७ - लहान बांधकामे" याखाली भागविण्यात येईल.

५. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील भाग-पहिला, उपविभाग-पाच मधील अनुक्रमांक १ येथील परिच्छेद क्र.१३४ अनुसार तसेच शासन निर्णय, वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम,भाग-२,दि.२०.०९.२०१९ मधील भाग-१ उपविभाग- पाच, परिच्छेद क्र. १३४(१), १३४(२) आणि १३४(३) नुसार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७०८१४४२११६११७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KAVITA PRADEEP PISE

Digitally signed by KAVITA PRADEEP PISE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=895D4DC43BA3105440C0329431446AE8333AB89578925B2D77D3806165DBD487, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AEEF37624AA6E5EA1AAA99D244C6C2A5F135097E5C07486A35D423835B4EC728, cn=KAVITA PRADEEP PISE
Date: 2026.07.08 16:37:56 +05'30'

(कविता प्र. पिसे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र- १/२ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.

२. आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई

३. संचालक-१, आरोग्य सेवा, मुंबई.
४. संनियंत्रक तथा मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे.
५. सह संचालक (आरोग्य सेवा), पुणे
६. उप संचालक, आरोग्य सेवा (परिवहन), पुणे.
७. जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, पुणे.
८. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे
९. जिल्हा कोषागार अधिकारी, जि. पुणे.
१०. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२), मंत्रालय, मुंबई.
११. अवर सचिव (अर्थसंकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवडनस्ती (पायाभुत सुविधा-२).

Name of Work:- Name of Work:- Repairs to NCCRC old Office building at Pune. (Repairs to Deputy Directors Cabin, Gents , Ladies Toilet and Misc. work.)

RECAPITULATION SHEET

(A) Work Portion		Rs.	2,192,778.00
(B) Testing Charges		Rs.	4,070.00
(C) Royalty Charges		Rs.	0.00
		Net Total Rs.	**2,196,848.00**
External Electrification	10%		219,684.80
Internal Electrification	10%		219,684.80
			2,636,217.60
Add for G. S. T. on (A+B+C)	18%	Rs.	395,433.00
Add for Labour Insurance on (A+B+C)	0.5%	Rs.	10,984.00
		Gross Total Rs.	**3,042,634.60**
		Say Rs.	**3,042,635.00**
Other Additional work			456,395.25
Total Amount		**Rs.**	**3,499,030.25**
Say			**Rs.3,500,000.00**

Assistant Engineer Gr-I
Building Construction SubDn No. 2
Pune - 411 011